## गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१.

### अधिसूचना

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस.१०२१/प्र.क्र.१८५/राउशु-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत) नियम, १९९६ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीशिवाय तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (ह १) नुसार तरतूद केल्याप्रमाणे व प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत) नियम, १९९६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत) (सुधारणा) नियम, २०२१ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र पेय मद्य (किरकोळ विक्रीची कमाल किंमत) नियम, १९९६ मधील नियम ५ मध्ये खंड (ए १) मधील उपखंड (i) ऐवजी खालील उपखंड समाविष्ठ करण्यात येत आहेः-

"(i)(अ) विदेशी मद्याचे (स्पिरीट्स) प्रति बल्क लिटर निर्मिती मूल्य रुपये २१० (रुपये दोनशे दहा फ़क्त) पेक्षा जास्त नसल्यास निर्मिती मूल्याच्या ३.५ पट अधिक मूल्यवर्धित कर प्रचलित दराने अधिक सीमा शुल्क.

(ब) विदेशी मद्याचे (स्पिरीट्स) प्रति बल्क लिटर निर्मिती मूल्य रुपये २१० (रुपये दोनशे दहा फ़क्त) पेक्षा जास्त असल्यास निर्मिती मूल्याच्या ३.५ पट अधिक रुपये २१० (रुपये दोनशे दहा फ़क्त) पेक्षा जास्त असणारे निर्मिती मूल्याच्या ४ पटीने वाढवून येणारी रक्कम अधिक मूल्यवर्धित कर प्रचलित दराने अधिक सीमा शुल्क."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव

**HOME DEPARTMENT,**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 18th November, 2021

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS.1021/C.R.185/EXC-2.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rule further to amend the Maharashtra Potable Liquor (Fixation of Maximum Retail Prices) Rules, 1996 should be brought in to force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra prohibition Act (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub clause (*ii*) of clause (h1) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules, further to amend the Maharashtra Potable Liquor (Fixation of Maximum Retail Prices) Rules, 1996 namely :—

1. These rules may be called the Maharashtra Potable Liquor (Fixation of Maximum Retail Prices) (Amendment) Rules, 2021.

2. In rule 5 of the Maharashtra Potable Liquor (Fixation of Maximum Retail Prices) Rules, 1996, in clause (A1), for sub-clause (*i*), the following sub-clause shall be substituted, namely ;

"(i) (a) 3.5 times the manufacturing cost plus value added tax at the prevalent rate plus custom duty, if manufacturing cost per bulk litre of Foreign Liquor (Spirits), does not exceed Rs. 210 (rupees two hundred ten only);

(b) 3.5 times the manufacturing cost increased by 4 times the manufacturing cost, in excess of Rs. 210 (rupees two hundred ten only) per bulk litre of Foreign Liquor (Spirits) plus value added tax at the prevalent rate plus custom duty if manufacturing cost per bulk litre of Foreign Liquor exceeds Rs.210 (rupees two hundred ten only)."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.